आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२९ मार्च २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत १६ नक्षली ठार
- राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतर मणिपूरमधे शांतता प्रस्थापित झाल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन
- म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या एक हजाराच्या वर, भारताकडून ‘ऑपरेशन ब्रम्हा’ अंतर्गत सहाय्य

**आणि**

- आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू मनीषा भानवाला हिला सुवर्णपदक

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात आज पहाटे सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत १६ नक्षली ठार झाले. केरलापार पोलीस स्थानकाच्या हद्दीतल्या जंगलात जिल्हा राखीव दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या संयुक्त पथकानं काल रात्री नक्षली विरोधी मोहीम राबवली होती. चकमकी दरम्यान सुरक्षा दलाचे दोन जवान किरकोळ जखमी झाले. या कारवाईत ठार झालेल्या १६ नक्षलींचे मृतदेह ताब्यात घेतल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं.

छत्तीसगडमधल्या या नक्षली विरोधी कारवाईच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे की, शस्त्र आणि हिंसाचारानं कोणताही बदल घडणार नसून, शांतता आणि विकासानंच ते साध्य होईल.

**<><><><><>**

मणिपूरमधे योग्य वेळी राष्ट्रपती राजवट लावण्यात आली असून राज्य आधीपेक्षा जास्त शांत झाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. काल रात्री एका

माध्यम संस्थेच्या परिषदेला ते संबोधित करत होते. राज्यात शांतता कायम करण्याच्या दृष्टीने सरकार मैतेई आणि कुकी समुदायाशी चर्चा करत आहे. सकारात्मक गोष्टी घडत असून चिंता करण्याचं कारण नाही असं गृहमंत्री म्हणाले. मणिपूरला वांशिक हिंसाचार नवीन नसून याआधीही असा हिंसाचार तीन ते चार वर्षे झाला आहे, असं गृहमंत्री म्हणाले.

दरम्यान, गृहमंत्री अमित शहा आज दोन दिवसांच्या बिहार दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते गोपालगंज इथं जाहीर सभा आणि पाटणा इथल्या राज्यस्तरीय सहकार परिषदेसह अनेक कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

एटीएममधून पैसे काढण्यासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कात वाढ केल्याप्रकरणी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. सरकारने बँकांना कलेक्शन एजंट बनवलं असल्याची टीका त्यांनी केली. बचत खातं आणि जन धन खात्यात किमान शिल्लक रक्कम न ठेवल्यामुळे केंद्र सरकारने २०१८ ते २०२४ या काळात कमीत कमी ४३ हजार ५०० कोटी बँकेतून काढले असा आरोप खरगे यांनी केला. आकारल्या जाणाऱ्या शुक्लातून जमा झालेल्या रकमेची माहिती सरकार संसदेसमोर ठेवत असे, आता ही परंपरा बंद झाली आहे, असं खरगे म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर नागपूर इथं येत आहेत. गुढीपाडव्यानिमित्त होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात ते रेशीमबागेतल्या स्मृती मंदिर इथं डॉ केशव बळिराम हेडगेवार यांना आदरांजली वाहतील. तसंच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हजारो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला, त्या दीक्षाभूमीलाही ते भेट देऊन आदरांजली वाहणार आहेत. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या विस्तार केंद्राची पायाभरणी

होणार असून, त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. त्यानंतर प्रधानमंत्री नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड इथं युद्धपयोगी सामग्री चाचणी तळ आणि यूएव्हीसाठी धावपट्टी सुविधेचं उद्घाटन करतील.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग आहे. आकाशवाणी आणि  दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, वेबसाईट, प्रधानमंत्री कार्यालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे यूट्यूब चॅनल आणि न्यूज ऑन एआरआर या ॲप वर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. त्यानंतर लगेच आकाशवाणीवरून प्रादेशिक भाषांमध्ये कार्यक्रमाचं प्रसारण होईल.

**<><><><>**

कॉपीराइट आणि डिझाइनला मान्यता तसंच पेटंटला जलदगतीने मंजुरी देण्यासाठी सरकार प्रयत्न करत असल्य़ाचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं. नवी दिल्लीत आज युनियन इंटरनॅशनल द ॲडव्होकेटच्या सत्राला संबोधित करताना ते बोलत होते.  न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता सुधारण्यात आणि जलद न्याय देण्यात तंत्रज्ञानाची भूमिका यावेळी त्यांनी अधोरेखित केली. इतर राष्ट्रांपेक्षा भारतामध्ये सरासरी वय २८ वर्षे आहे, ज्यामुळे भारतात तरुणांची संख्या जास्त असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

म्यानमारमध्ये काल झालेल्या शक्तिशाली भूकंपात मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा १ हजाराच्या वर पोहोचला आहे. या भूकंपात २ हजार ३७६ जण जखमी झाले असून ३० जण बेपत्ता आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता असल्याचं स्थानिक प्रशासनानं म्हटलं आहे.

म्यानमारमध्ये काल ७ पूर्णांक ७ दशांश रिक्टर स्केल आणि त्यानंतर पुन्हा ४ पूर्णांक २ दशांश रिक्टर स्केल असे दोनदा भूकंपाचे धक्के बसले होते. थायलंड मधेही या भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. राजधानी बँगकॉकमध्ये ६ जण मृत्युमुखी पडले, २६ जण जखमी झाले, तर ४७ जण बेपत्ता आहेत.

भूकंपग्रस्त म्यानमारच्या मदतीसाठी भारतानं उघडलेल्या 'ऑपरेशन ब्रम्हा' मोहिमे अंतर्गत पाठवलेल्या १५ टन मानवतावादी सहाय्याची पहिली खेप आज यांगोन इथं पोहोचली. बचाव कार्यासाठी जगभरातून मदतीचा ओघ येत आहे. रशियाच्या आपत्कालीन मंत्रालयानं १२० जणांच्या बचाव पथकासह अत्यावश्यक साहित्य घेऊन दोन विमानं रवाना केली आहेत. चीनचं बचाव पथकही भूकंप शोधक, ड्रोन आणि इतर साहित्यासह,आज सकाळी यांगॉन इथं पोहोचलं. संयुक्त राष्ट्रांनी बचाव कार्यासाठी ५० लाख डॉलर्सची तरतूद केली आहे.

म्यानमारमध्ये काल झालेल्या भूकंपाचा केंद्रबिंदू मंडालेपासून जवळ होता. भूकंपा नंतरच्या अनेक धक्क्यांपैकी एक ६ पूर्णांक ४ दशांश रिक्टर स्केल तीव्रतेचा होता.

**<><><><><>**

रशियाने युक्रेनवर काल रात्री केलेल्या ड्रोन हल्ल्यात चार जणांचा मृत्यू झाला असून १९ जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यात अनेक रेस्टॉरंट आणि निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या. रशियान लष्कराने याबद्दल काहीही प्रतिक्रिया दिली नाही. तर रशियाने तात्पुरत्या युद्धबंदीचं उल्लंघन केल्याचा आरोप युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी केला आहे.

**<><><><><>**

जॉर्डनमध्ये अम्मान इथं झालेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू मनीषा भानवालाने सुवर्णपदक जिंकलं आहे. तर अंतिम पंघालने कांस्यपदक मिळवलं आहे. महिलांच्या ६२ किलो वजनी गटात मनीषाने कोरियाच्या ओक जू किमचा ८-७ असा पराभव केला. दरम्यान, ५३ किलो गटाच्या अंतिम

पंघालने तैपेईच्या मेंग एच हसीहचा एकही गुण न गमावता पराभव केला. भारतीय कुस्तीगीरांनी या स्पर्धेत आतापर्यंत एक सुवर्ण, एक रौप्य आणि सहा कांस्यपदके जिंकली आहेत. पुरुषांची फ्रीस्टाइल स्पर्धा आजपासून सुरू होत आहे.

<><><><><>

नोवाक जोकोविचने मियामी खुल्या टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत त्याने बल्गेरियाच्या ग्रिगोर दिमित्रोव्हचा ६-२, ६-३ असा पराभव केला. दुसऱ्या उपांत्य फेरीत अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झने चेक प्रजासत्ताकच्या जाकुब मेन्सिकचा पराभव केला. उद्या अंतिम फेरीत जोकोविचचा सामना टेलर फ्रिट्झशी होणार आहे.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांनी दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या व्यापार युद्धादरम्यान दूरध्वनीवर चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी काल नवीन आर्थिक आणि सुरक्षा संबंधांवर व्यापक चर्चा सुरू करण्यासाठी सहमती दर्शविली असल्याचं कॅनडाच्या प्रधानमंत्री कार्यालयानं म्हटलं आहे. दोन्ही नेत्यांमधील ही पहिलीच चर्चा होती. या चर्चेच्या २४ तास आधी, कार्नी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या कॅनडाच्या वस्तूंवर शुल्क वाढवण्याच्या निर्णयाला आव्हान दिले होते. ट्रम्प यांनी २ एप्रिलपासून परदेशी गाड्यांवर २५ टक्के शुल्क लावण्याची घोषणा केली होती.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सचा सामना मुंबई इंडियन्सशी होणार आहे. हा सामना अहमदाबादमध्ये होणार असून संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरू होईल. याआधीचे सामने गमावल्यानंतर दोन्ही संघ हा सामना जिंकून पुनरागमन करण्याचा प्रयत्न करतील.

दरम्यान काल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं चेन्नई सुपर किंग्जचा पन्नास धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना बंगळुरूनं सात विकेट गमावून १९६ धावा केल्या. तर चेन्नई सुपर किंग्जला आठ विकेटच्या मोबदल्यात फक्त १४६ धावा करता आल्या. ३२ चेंडूत ५१ धावा करणाऱ्या कर्णधार रजत पाटीदारला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं.

**<><><><><>**

संरक्षण मंत्रालयानं हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडसोबत १५६ हलकी लढाऊ हेलिकॉप्टर्स, प्रचंड आणि इतर संबंधित उपकरणांच्या पुरवठ्यासाठी आणि प्रशिक्षणासाठी ६२ हजार ७०० कोटी रुपयांचे दोन करार केले आहेत. या करारांमुळं सशस्त्र दलांची लढाऊ क्षमता वाढेल. हलकी लढाऊ हेलिकॉप्टर्स हे भारताचं पहिलं संपूर्णपणे स्वदेशी बनावटीचं लढाऊ हेलिकॉप्टर आहे, त्याची क्षमता पाच हजार मीटरपेक्षा जास्त उंचीवर काम करण्याची आहे, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं आज पश्चिम बंगाल, सिक्कीम, गोवा आणि महाराष्ट्रात काही ठिकाणी वादळ आणि हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवली आहे. पुढील दोन दिवस वायव्य आणि मध्य भारतात कमाल तापमानात २ ते ५ अंश सेल्सिअसनं घट होण्याची शक्यता आहे. उद्यापर्यंत ओदिशाच्या अंतर्गत भागात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**